MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता®

विशेषांक, फेब्रुवारी २०१८

# साहित्य चर्चा आणि चिंतन



❖ संपादक ❖
प्रा.विराग गावंडे
डॉ.संजय कोठारी
डॉ.दिनेश निचीत

✲ प्रकाशक ✲
संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वालेगांव,जि.अमरावती
आणि आधार सामाजिक संशोधन विकास प्रशिक्षण संस्था, अमरावती

www.vidyawarta.com

10) तमाशातील स्त्री लिावंताचे जीवन्र
**प्रा.डॉ.बाबाराव मारोती ठावरी** || 45
मराठी विभागप्रमुख, भगवंतराव कला महाविद्यालय,सिरोंचा, जि.गडचिरोली

11) साठोत्तरी मराठी साहित्यविश्व
**डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील** || 49
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज,ता. कराड जि. सातारा

12) साहित्य सांगते संतांची महती!
**स्वाती जोशी** || 52
स्कुल ऑफ स्कॉलर्स, हिंगणा रोड, अकोला.

13) महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक सुधारणा
**प्रा.डी.डी.जोंधळे, सहा.प्राध्यापक** || 56
श्री बा.दे.पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

14) १९९० नंतरची ग्रामीण कादंबरी
**प्रा. प्रभाकर जे. जांभुळे** || 60
मराठी विभाग प्रमुख कला, वाणिज्य महाविद्यालय, येवदा

15) बौध्दधर्मातील थेरीगाथा आणि संत कवयित्रींची स्त्रीमुक्ति संकल्पना
**प्रा.प्रज्ञा कांबळे,शिरगांवकर** || 62
वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जि. सांगली

16) सामाजिक बोलीविज्ञान - व्यावसायिकांची बोली
**प्रा. माया तानाजी शिंदे** || 67
महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, चोपडा, जळगांव

17) शेतकऱ्याचे वास्तव जीवन व जीवन संघर्ष मांडणारी अशोक कौतिक कोळी यांची 'पाडा' ...
**प्रा.पाटील मंगला बन्सीलाल** | 68
पूज्य सानेगुरूजी विद्याप्रसारक, मंडळाचे स.ई.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ,शहादा

18) ग्रामीण साहित्याची वाटचाल
**प्रा. दिलीप महादू कोने** || 71
मराठी विभागप्रमुख ल.भा.पा महिला महाविद्यालय, सात रस्ता परिसर, 'उपलप' जवळ सोलापूर

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

संत कबिर —

संत कबिरांचे दोहे तर प्रसिद्ध आहेत. यामध्ये त्यांनी सात बोलीभाषेचा खुबीने वापर केला आहे. कबिरांच्या एका दोह्यावर एका ग्रंथाची निर्मिती होऊ शकते. एवढे तत्वज्ञान त्यांच्या साहित्यात दिसून येते. कबिरांच्या आई — वडिलांचा पत्ता नव्हता. नदीकिनारी एका स्त्रीने बावरस सोडून दिलेल्या मुलाचे मुस्लिम दाम्पत्याने संगोपन केले. कीरपंथ देशात नावारुपाला आला. कबीर म्हणतात...

बडा हुवा तो क्या हुवा
जैसे पेड खजूर
पंछी को छाया नही
फल लगे अति दूर

आणखी एका दोह्यात ते म्हणतात

माया मरी न मन मरा
मर मर गये शरीर
आशा तृष्णा न मरी
कह गये संत कबीर

कबिरांचे दोहे लोकांच्या जीभेवर रुळले आहेत. संतांनी निर्माण केलेल्या साहित्याला तोड नाही, जगाच्या कल्याणासाठी त्यांनी आपला देह कष्टविला. संतांचे अभंग म्हणजे कधीही भंग न पावणारे साहित्य आहे ज्या काळात मुद्रणकला अस्तित्वात नव्हती, त्या काळात अभंगरचना करून विचाराचा प्रसार करणाऱ्या संतांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

एकूणच मराठी साहित्यातील संतांचे वाङ्मयीन कार्य फार मोठे आहे. पारमार्थिक प्रवासात ही संत मंडळी लोकसमूहाचे प्रतिनिधीत्व करत होती लोकांना जीवन विषयक आचार — विचार शिकवत होती. लोकमाणसाची बिघडलेली मनोधारणा पुन्हा सजग करणयाचा त्यांचा प्रयत्न होता. तो प्रयत्न भूतकाळाबरोबरच वर्तमान व भविष्य काळही घडवेल यात शंकाच नाही. लोकजीवनाला या संत साहित्यातील विचारांमुळेच एक समृद्धता प्राप्त झाली आहे. विशेष म्हणजे कर्मकांडाविरुद्ध बंड, जनसामान्याविषयी अतिशय जिव्हाळा, यामुळे संतांचे साहित्य ही जणू ज्ञानाचा झरा ठरला आहे. वैचारिक प्रगल्भामुळे संत साहित्यातील विचार काळाच्या ओघात अबाधित राहिले आहेत.

❑❑❑

13

# महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक सुधारणा

प्रा.डी.डी.जोंधळे, सहा.प्राध्यापक
श्री बा.दे.पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा

**********

म.बसेश्वर म्हणजे कर्मठांच्या चातुर्णर्याच्या चिरेबंदी बुरूजांवर हल्ले करणारा पहिला बिनीचा सरदार. समतेची मंगलप्रभा पसरविणारा तेजोनिधी, स्त्रियांना मुक्तीची पंख देऊन अवकाशात भरारी मारायला लावणारा स्त्रीउध्दारक, उपेक्षितांच्या अंतरंगात आत्मविश्वास जागविणारा मुक्तिदाता, अस्पृश्यांच्या गळ्यातील मडकी फोडणारा, कमरेभोवतीचा खराटा काढून परंपरेच्या बेडया तोडणारा अस्पृश्योध्दारक, स्त्री—शूद्रांना अनुभव मंटपाच्या विचारपीठाव्दारे, दाबलेले दु:खाचे कढ उघडे करण्याचे स्वातंत्र्य बहाल करणार युगपुरूष, लोकांना स्वर्ग –नरकाच्या काल्पनिक फसव्या मोहजालातून वास्तवाच्या दुनियेत घेऊन येणारा जीवनादाता म्हणजे म.बसवेश्वर, समाजसुधारणेच्या क्षेत्रातील स्वयंभू उत्तुंग हिमालयच।

महात्मा बसवेश्वर हे समाजवादी समाज रचनेचे अध्वर्यू होते. महात्मा गौतम बुध्द, भगवान महावीर यांच्यानंतर इतिहासात कृतीशील समाज सुधारक महात्मा बसवेश्वरांचे स्थान अग्रगण्य समजले जाते. १२व्या दशकात सरंजामशाही व्यवस्थेचे आणि धर्मवादी कर्मकांडाचे अवास्तव स्त्रोत माजले होते. त्याला आवाहन देणारे श्रेष्ठ क्रांतीकारक म्हणुन बसश्वेरांचे कार्य समाजावून घेतले पाहिजे.

एक महान क्रांतीकारक आणि समाजसुधारक महात्मा बसवेश्वर होते. मागासलेल्या समाज जीवनात नवसंजीव सामर्थ्य देण्याचे ऐतिहासीक कार्य महात्मा बसश्वेरांनी पुर्णत्वाला नेले. धर्माच्या नावाखाली चाललेल्या कर्मठपणाला व बुवाबाजीला कडवा विरोध करीत, खरा धर्म काय आहे सांगण्याचे तसेच

जातीभेद, अस्पृश्योधारक, उच्छ निश्चिता या सारख्या समाजघातक रूढींना मुठमाती देऊन समाजात समता प्रस्थापित करण्याचे स्त्रीयांना समाजात समानतेचे प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्याचे, समाजात उद्योगशिल बनविण्याचे व साहित्य दालन समृध्द करण्याचे समता, स्वातंत्र्य, बंधूत्वाच्या मुलभुत सुत्रांवर आधारलेली अनुभव मंटप या नावाची आदर्श संस्था स्थापन करण्याचे मौलीक कार्य महात्मा बसवेश्वरांनी केले.

**१) चातुर्वर्ण्य झुगारले**

बाराव्या शतकातील प्रचलीत समाज व्यवस्थेत चातुर्वर्ण्य व जातिव्यवस्थेची मुळे खूप खोलवर गेलेली होती. नविन काही जमिनीत रूजवायचे असेल तर, शेतकऱ्याला मागील वर्षाची तणकटे—फणकटे मुळासकट उपटणे आवश्यक असते. त्याशिवाय नविन रोपटे तिथे मुळ धरू शकत नाही. हा निसर्गसृष्टीचा नियमच आहे. या निसर्गनियमाला अनुसरून म.बसवेश्वरांनी हजारो वर्षाच्या जुन्या वर्णव्यवस्थेच्या चिरेबंदी हल्ल्यावर हल्ले करणे सुरू केले. आपल्या पुढील वचनात ते ऋषिमुनींच्या जातींचा दाखला देऊन सांगतात की, जातींच्या श्रेष्ठत्वावर गुणावगुण अवलंबुन नसतात.

व्यास भोईणीचा पुत्र, मार्कंडेय मातंगीचा पुत्र:
कुल—गोत्रांच्या अगोदर काय होते?
साक्षात अगस्त्य बेरड, दुर्वास चांभार,
कश्यप लोहार, न्हावी कौंडिण्यासी
सारे त्रिभुवन जावणे पहा.

आमच्या कूडलसंगमदेवाची वचनच असे आहे—

श्वपच असला तरी शिवभक्तच कुलीन आहे.

म.बसवेश्वर अन्य जातींच्या लोंका प्रमाणेच अस्पृश्य महार—मांगाच्या घरीही जात. त्यांचे भोजन आंदनाने स्वीकारीत. डोहर कक्कय्यांना ते आजोबा म्हणत, तर मातंग चेन्नय्यांना वडील. नागीदेव कांबळे यांच्याकडे ते जेव्हा भोजनाला गेले, तेंव्हा बिज्जव राजदरबारातील काही मंत्र्यांनी राजाकडे तक्रार केली की, मंत्री बसवेश्वर प्रत्यक्ष राजदरबारालाही अपवित्र करून बाटवीत आहे.

जातीवर्णव्यवस्थेविषयी अंतर्मुख करण्यासाठी ते म्हणतात.

रज:स्थैर्याविन पिंडास नसे आधार,
शुक्र—शोणिताचा एकच असे व्यवहार.
आशा, आमिष, क्रोध, हर्षादी विषयही एकच:
वाचुन काय नि ऐकून काय फल?
कुलज म्हणविण्यास कोणता निकष?
लोखंड तापवून लोहार होतसे,
कपडे धुवून परीट होतसे,
सूत विणून विणकर होतसे,
जगी जन्मला का कोणी कानातून?
म्हणून लिंगस्थल जाणतो तोच कुलीन,
कूडलसंगमदेवा.

अशा तऱ्हेने निकोप सामाजीक अभिसरण होण्यासाठी वर्णधर्माची बंधने झुगारणे आवश्यक होते.

**२) सर्व जातिवर्णांत रोटी—बेटी व्यवहार**

'जी जातच नाही ती जा' अशी आपल्या भारतातील जात आहे. वर्णव्यवस्थेच्या वृक्षाला आलेले कटू फळ म्हणजे आमची 'जात'. व्यक्तीची योग्यता वाढविण्यासाठी, तिचा आदर करण्यासाठी, काम करण्यास प्रोत्सहित करण्यासाठी बसवेश्वर आयुष्यभर खपत होते. धार्मिक सहिष्णुता निर्माण करण्यासाठी, जातीय भावना नष्ट करण्यासाठी, सर्वांना एकत्र गुंफण्यासाठीच त्यांनी इष्टलिंगदीक्षा देणे सुरू केले. लिंगधारणा केल्यानंतर पूर्वाश्रमीची जात नष्ट होते. मग त्यांच्यात रोटी—बेटी व्यवहार व्हावयास काहीच हरकत नाही. अशा तऱ्हेने जातिभेद नष्ट करण्याचे आंदोलन त्यांनी सुरू केले. म.बसवेश्वर कोणतीही सुधारणा किंवा मौलिक विचार केवळ सांगितला किंवा वचनातच लिहिला असे नाही. तर त्याचा प्रारंभ स्वत:चया कृतीने प्रत्यक्ष आचरणात आणून दाखविला.

म.बसवेश्वर मंत्रिपदावर असतानाही अस्पृश्यांच्या घरी भोजनाला जात. त्यांचा विश्वासू खाजगी मदतनीस 'हडपद अप्पण्णा' हा पूर्वाश्रमीचा न्हावी होता. राजाच्या पागेतील सेवक 'सोड्डळ बाचरस' याच्याशी त्यांनी उत्कट मैत्री होती. 'कक्कय्या' हे डोहर समाजातील शरण बिज्जळाच्या सैन्यातील अश्वदलात अधिकारी होते. काही काळ त्यांनी कातडे कमावण्याचा व्यवसायही केला होत. बसवेश्वरांवर त्यांनी नितांत श्रध्दा होती. बसवेश्वरांच्या विश्वासू

सहकारी शरण 'मडिवाळ माचय्या' हा धोबी होता. 'हरळय्या' हा चांभार होता. अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

**३) स्त्रियांना मुक्तीचे पंख**

सनातनी समाजाने शूद्रांना पशूच्या पंक्तीत बसविले. (गरूड पुराण, अध्याय १०९, आचारखंड श्लोक ३१) संत तुलसीदास म्हणतात, 'ढोल, गॅवार, शूद्र, पशू, नारी ये सब ताडनके अधिकारी,' गतेतिहासात अशी कितीतरी उदाहरणे आहेत. स्त्रिांच्या क्रयविक्रय सामान्य गोष्ट होती. मनुवादी परपरेने स्त्रियांच्या पायात परंपरेच्या बेडया टाकून त्यांच्या नशिबी जनावरांप्रमाणे केवळ मान्यांचे जिणे आणले हेते. परंपरागत समाजात 'स्त्री' ही परमार्थ मार्गातील धोंड, मोक्षप्राप्ततील अडसर समजली जात होती. काही संतांनीही अशीच भूमिका घेतलेली होती. म.बसवेश्वर, अल्लमप्रभू, चेन्नबसवेश्वर, अक्कमहादेवी, सिध्दरामेश्वर आदी प्रमथांनी बाराव्या शतकात स्त्रियांना अनुभव मंटपाच्या व्यापक पीठावर आणून त्यांच्या पायातील कर्मठांच्या बेडया तोडल्या आणि मानवतेच्या पीठावर पुरूषांच्या जोडीला सर्व जातींच्या स्त्रियांनाही सन्मानाने बसविणे. या सुंदर निसर्गसृष्टीचा व जीवनाचा आनंद घेण्याचा अधिकार पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही आहे. म्हणूनच त्यांना बोलते—लिहिते केले. त्या काळी पंच्याण्णव टक्के समाज निरक्षर होता त्यांना साक्षर करून त्यांच्या भावजीवनावर व प्रतिभेच्या कारंज्यावर पडलेले सनातनी दगडधोंडे बोजूला करून त्यांच्या दबलेल्या मूक भावनांनी कारंजी थुई—थुई प्रवाहित होऊ दिली. अशा अनुभव मंटपातील तेजस्वी शिवशरणी कवयित्री झाल्या. ज्ञात अशा शरणींची संख्या संशोधक पस्तीत सांगतात. त्यांच्या रचना सनातन्यांच्या क्षोभाच्या अग्निस्थानी पडल्या अशा राखरांगोळी झालेल्या रचना तर असंख्या आहेत.

**४) स्त्रियांनीही व्यवसाय—उद्योग करावा.**

अनुभव मंटपाच्या सदस्या असलेल्या शरणींना उदरनिर्वाहासाठी कोणता तरी व्यवसाय किंवा काम करणे अनिवार्य होते. त्याला लिंगायत विचारविश्वात संज्ञा आहे 'कायक' काश्मिरातील महाराणी 'मोळिगे महादेवी' चे कायक होते मोळी विकणे, 'अय्दक्की लक्कम्मा' चे कायक सांडलेले धान्य निवडून गोळा करणे, 'रेमव्वा' चे सूत कातणे, 'रेवम्मा' चे सौंदर्यप्रसाधणे विकणे, 'सोमम्मा' चे धान कांडणे, 'काळव्वा' चे सुतारकाम इ. अशा कितीतरी ज्ञन—अज्ञान शरणी कवयित्री आहे. म.बसवेश्वरांनी समाजाच्या गरीब स्तरावरील स्त्रियांमध्ये मोठया प्रयासाने आत्मविश्वास निर्माण करून त्यांना कर्तव्यकठोर, स्वावलंबी व स्वाभिमानी बनवून ताठ उभे केले होते.

**५) स्त्रियांनी काव्यात्मक अभिव्यक्ती**

शरणांच्या आंदोलनात तीनशेहून अधिक स्त्रियांनी भाग घेतला होत. अनुभव मंटपातील सत्त्याहत्तर स्त्रियांची नोंद संशोधकांनी केलेली असून जाळपोळीपासून वाचविणे ही महत्वाचे कार्ये त्यांनी केलेली आहेत. या सर्वामागे प्रेरक शक्ती, शूद्र, गुलाम स्त्रियांना अनुभव मंटपाच्या मुक्तांगणात ज्यांनी समतेचे क्षितिज दाखविले, त्या बसवेश्वरांची होती.

**६) विधवांचा पुनर्विवाह**

वैदिक संस्कृतीमध्ये अपघाताने अचानक वैधत्व आले असले तरी, अशा स्त्रियांकडे सहानुभुतीने पाहिले जात नव्हते. मंगल उतसवात, पूजाविधित तिची उपस्थिती व दर्शन अशुभ मानले जाई. तिने सुंदर दिसणाऱ्या सर्व आभूषणांचा त्याग करावा. सौभाग्यचिन्हे त्यागावातीत व जिवंतपणी मृतवत आयुष्य जगावे म्हणजे आपण आपल्या सनातन धर्मसंस्कृतीचे उत्तम पालन करणे. यामुळे स्वर्गात श्रेष्ठ स्थान व पुढचा जन्म राजाच्याच घरी मिळतो असे तिच्या संस्कृतिरक्षक नातेवाईकांना वाटत असे. ''लिंगायत धर्मात विधवा मुक्तपणे विवाह समारंभात किंवा धार्मिक विधींमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होऊ शकतात'' लिंगायत संस्कृतीमध्ये विधवांना अपवित्र किंवा अस्पृश्य मानलेले नाही. पतिनिधनानंतर केशवपन, सती जाणे या प्रकारांना अजिबात मान्यता नाही. पुरूष जर पत्नीच्या निधनानंतर पुनर्विवाह करू शकतात, तर स्त्रियांनी सुरक्षिततेपासून का वंचित रहावे? ही बसवेश्वरांनी भूमिका होती.

**७) वेश्यांचेही पुनर्वसन व्हावे**

प्रतिकूल आर्थिक व कौटूंबि परिस्थितीमुळे अत्यंत नाईलाजाने काही स्त्रियांना पोट भरण्यासाठी घृणित व अनैतिक व्यवसाय करावा लागतो. तत्कालीन राजे, धनिक, सरदार व ढोंगी धर्माचरी लोकांनी देवळांतून

'देवदासी' च्या रूपात तरूणींना ठेवण्याची प्रथा रूढ केल्यामुळे असहाय व भोळया—भाबडया मुलींना नाईलाजाने वासनेच्या विखारांना बळी पडावे लागते या वास्तवाची बसवेश्वरांना जाण होती.

बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात 'संकव्वा' ही पूर्वायुष्यातील वेश्या होती. बसवादी शिवशरणांच्या पवित्र सहवासात आल्यानंतर तिला उपरती झाली व ती शरणी बनली.

अशा प्रकारे बाराव्या शतकात बसवेश्वरांनी व त्यांच्या सहकारी शरणांनी वेश्यांना मार्गदर्शन करून, त्यांचे विवाह घडवून आणून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करून दिलेले होते. आजच्या भाषेत त्यांचे 'पुनर्वसन' केले.

८) आंतरजातीय विवाहाचे समर्थन

बसवेश्वरांनी भारतातील बंदिस्त जातिव्यवस्थेची बंधने तोडण्याचे, उद्ध्वस्त करण्याचे जणू कंकणच बांधलेले होते. पूर्वाश्रमीची कोणतीही जात असेल आणि त्या व्यक्तीचा इष्टलिंग दीक्षाविधी झाला असेल, तर ते लिंगायत होतो. असे स्त्री—पुरूष शिवकुलाच्या एकाच समान धाग्याचे परस्परांशी अनुबंधित होतात. मग सर्व लिंगधारी स्त्री—पुरूषांत आपापसात रोटी—बेटी व्यवहार होऊ शकतात.

मानव हा इथून—तिथून एकच. अशा मानवतावादाने प्रेरित झाल्यामुळे बसवेश्वरांनी समत्व भावना निर्माण करण्यासाठी जातिभावनांची परंपरागत बंधने झुगारिली आणि धिक्कारिली. सत्त्वहीन समाजात आत्मतेज निर्माण केले. सर्व जातिवर्णात विवाह व्हावयास प्रारंभ झाला. या अनुभव मंटपातील शरण शरणींची संपूर्ण संमती होती. कल्याण राज्याची किर्ती सर्वदूर परसली. उत्तरेत काश्मीरपासून ते दक्षिणेतील चोळ राज्यापर्यंतचे स्त्री—पुरूष हा अभिनव प्रयोग पाहण्यास येत असत.

९) स्त्री मुक्तीचा आद्य प्रणेता व उद्गाता.

म.बसवेश्वरांनी संबंध भारतात प्रथमच महिलांना संघटित केले. त्या काळी पुरूषच निरक्षक होते. मग स्त्रियांना कोण साक्षर करणार? परंतु बसवेश्वरांनी स्त्रियांनाही साक्षर केले. त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. जवळपास पस्तीस स्त्री वचनकारांच्या काव्यमय रचना उपलब्ध झाल्या आहेत. सनातन्यांनी तावलेल्या आगीत पुष्कळशा रचना नष्ट झाल्या.

स्त्रियांच्या विचारांना मुक्त वाट दिल्यामुळे त्याच्या वाङ्‌मयनिमितीस प्रोत्साहन मिळाले. बसवेश्वरांनी स्त्रियांना व्यवसाय/कायक करण्यास उद्युक्त केले. स्वावलंबी जीवन जगण्यास शिकविले. विधवांच्या पुनर्विवाहास उत्तेजन दिले. बालविवाहास मनाई केली. अंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. वेश्यांचेही पुनर्वसन केले. अनुभव मंटपातील सामाजिक —धार्मिक विषयांवरील समूहचर्चेत स्त्रियांनाही सहभागी करून घेतले. त्यांचा आत्मविश्वास वाढविला. उदा.चांभार, महार, तांदूळ वेचणारी, चरखा चालविणारी, सूत कातणरी, सुतारकामात मदत करणारी, दोर वळणारी, धान्य कुटणारी, पश्चात्तापदग्ध वेश्या, राजाची महाराणी, मंत्रिपत्नी, सैनिकपत्नी, गावाची झाडलोट करणारी, गायिका इ.

आज एकविसाव्या शतकात स्त्रीमुक्तीसाठी, स्त्रियांच्या सक्षमता वाढीसाठी व सबलीकरणासाठी जे जे काही होत आहे, त्याचा प्रारंभ बसवेश्वरांनी आपल्या राज्यात केलेला होता.

**संदर्भग्रंथ**

१) डॉ. अशोक म. मेनकुळे, क्रांतीकारी युगप्रवर्तक, महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद, हिमसेठ संस्थान भालकी जि.बिदर कर्नाटक

२) जगद्‌गुरू माते महादेवी : विश्वगुरू बसवण्णा प्र.८०

३) राजेंद्र जिशबे : श्री बसवश्वेर आणि पद्‌दलीत शिवशरण

४) डॉ.भगवानदास तिवारी : म.बसवेश्वर व्यक्ती और दर्शन वचन क्र.१४२४

५) अभय मनोहर कलावार : दक्षिणेचा प्रबुध्द महात्मा बसवेश्वर

□□□